***विशेष गरजा असणाऱ्या बालकांच्या पालकांसाठी आयोजित ऑनलाईन वेबिनारची यशस्विता***

राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धा २०२१-२२ साठी
सादर नवोपक्रम

**सादरकर्ता**
डॉ.गंगाधर विठोबा वाळले ,
वरिष्ठ अधिव्याख्याता,
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, नागपूर

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र –पुणे

नवोपक्रम वर्ष २०२१-२२

**प्रतिज्ञापत्र**

मी **डॉ.गंगाधर विठोबा वाळले,**वरिष्ठ अधिव्याख्याता, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,नागपूर प्रतिज्ञापत्र लिहून देतो की,या नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला **विशेष गरजा असणाऱ्या बालकांच्या पालकांसाठी आयोजित ऑनलाईन वेबिनारची यशस्विता** हा नवोपक्रम माझ्या स्वतःच्या शैक्षणिक उपक्रमांवर व अनुभवावर आधारित आहे.

हा नवोपक्रम मला स्वतःला सुचलेला आहे,काल्पनिक नाही.तसेच भारतीय अथवा विदेशी लेखकांच्या ग्रंथातील अथवा संशोधनातील माहितीच्या आधारे लिहिलेला नसून यामध्ये मला जाणवलेलेल्या समस्येचा सूक्ष्म अभ्यास करण्याचा मी प्रयत्न केलेला आहे.हा नवोपक्रम यापूर्वीच्या राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला नाही.तसेच इतर कोणत्याही व्यक्तीकडून लिहून घेऊन तो मी माझ्या नावावर सादर केलेला नाही.तसे आढळून आल्यास तो Copyright Act 1957 खाली गुन्हा आहे,याची मला कल्पना आहे.

दिनांक-10/11/2021 स्पर्धकाची स्वाक्षरी

स्थळ-नागपूर **डॉ.गंगाधर विठोबा वाळले ,**
**वरिष्ठ अधिव्याख्याता,**
**जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,नागपूर**

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की,
श्री.**डॉ.गंगाधर विठोबा वाळले,**वरिष्ठ अधिव्याख्याता,हे जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,नागपूर या कार्यालयात कार्यरत असून त्यांनी सादर केलेला **विशेष गरजा असणाऱ्या बालकांच्या पालकांसाठी आयोजित ऑनलाईन वेबिनारची यशस्विता** हा नवोपक्रम शैक्षणिक वर्ष 2021-22 मध्ये त्यांनी स्वतः राबविलेला असून त्यांच्या स्व- परिश्रमाची फलश्रुती आहे.हा नवोपक्रम त्यांनी MSCERT मार्फत आयोजित यापूर्वीच्या राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला नाही.

दिनांक -09/11/202102
स्थळ- **नागपूर**

**(डॉ.हर्षलता बुराडे)**
**प्राचार्य**
**जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, नागपूर**

## अनुक्रमणिका


| **अ.क्र.** | **तपशील** | **पृष्ठ क्र.** |
|---|---|---|
| अ)I | मुखपृष्ठ | 1 |
| II | प्रतिज्ञापत्र | 2 |
| III | प्रमाणपत्र | 3 |
| IV | अनुक्रमणिका | 4 |
| ब) 1. | नवोपक्रमाचे शीर्षक | 6 |
| 2. | नवोपक्रमाची प्रस्तावना | 6 |
| 3. | नवोपक्रमाची गरज व महत्त्व | 7 |
| 4. | नवोपक्रमाचे वेगळेपण | 7 |

| | | |
|---|---|---|
| 5. | नवोक्रमाची उपयुक्तता | 7 |
| 6. | नवोपक्रमाची उद्दिष्टे | 8 |
| 7. | नवोपक्रमाचे नियोजन | 8 |
| 8. | नवोपक्रमाची कार्यपध्द्ती | 10 |
| 9. | नवोपक्रमाची यशस्विता /फलनिष्पत्ती (उद्दिष्टांनुसार ) | 12 |
| 10 | नवोपक्रमाच्या यशस्वितेवरून मांडलेल्या शिफारशी | 21 |
| 11 | समारोप | 22 |
| 12. | अ)संदर्भसूची | 22 |
| | ब)परिशिष्टे | 22 |
| | **कोष्टके ,आलेख व आकृत्या यांची अनुक्रमणिका** | |
| क) i | कोष्टक क्र.1 नवोपक्रम कार्यवाहीचे टप्पे (वेळापत्रक) | 9 |
| ii | कोष्टक क्र.२ -ऑनलाईन वेबिनार तालुकानिहाय नियोजन | 11 |
| iii | कोष्टक क्र.3 -ऑनलाईन वेबिनार तालुकानिहाय पालक उपस्थिती | 12 |
| iv | कोष्टक क्र.4-यापूर्वी ऑनलाईन वेबिनारचा लाभ घेतलेल्या पालकांची मते दर्शविणारा तक्ता. | 12 |
| v | कोष्टक क्र.5 -वेबिनारचा आपल्या पाल्यास फायदा झाला असा प्रतिसाद देणाऱ्या पालकांची माहिती | 13 |
| VI | कोष्टक क्र.6 -वेबिनारचा इतर पाल्यास फायदा झाला असा प्रतिसाद देणाऱ्या पालकांची माहिती | 14 |
| VII | कोष्टक क्र.7-अशाप्रकारचे ऑनलाईन वेबिनार आयोजित करावे असे वाटणारे पालक माहिती | 15 |
| VIII | कोष्टक क्र.8-यापूर्वी अशा ऑनलाईन वेबिनारचे आयोजन केले होते का ? या प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद | 15 |
| IX | कोष्टक क्र.9 -आयोजन केलेल्या ऑनलाईन वेबिनारसाठी विशेषतज्ज्ञ व विशेष शिक्षक यांनी निभावलेली भूमिका | 16 |
| X | कोष्टक क्र.10- आयोजन केलेल्या ऑनलाईन वेबिनारचा विशेष गरजा असणाऱ्या बालकांस झालेल्या फायद्याचे प्रमाण | 17 |
| XI | कोष्टक क्र.11-आयोजन केलेल्या ऑनलाईन वेबिनारचा इतर बालकांस झालेल्या फायद्याचे प्रमाण | 17 |
| XII | कोष्टक क्र.12- आयोजन केलेल्या ऑनलाईन वेबिनारचा आपल्या कामात झालेल्या फायद्याचे प्रमाणाबाबत आयोजकांचे मत | 18 |
| XIII | कोष्टक क्र.13-आयोजकांस ऑनलाईन वेबिनारचे आयोजन करण्यात आलेल्या अडचणीचा आढावा | 18 |
| XIX | कोष्टक क्र.14-ऑनलाईन वेबिनारचे आयोजन करण्यात आलेल्या अडचणीचे स्वरूप | 19 |
| XV | कोष्टक क्र.15-यापुढे अशाप्रकारचे ऑनलाईन वेबिनार आयोजित करावे असे वाटते याचा गोषवारा | 20 |
| ख) i | आकृती क्र.१- वेबिनारचा फायदा झाला असा प्रतिसाद देणाऱ्या पालकांची माहिती | 13 |
| ii | आकृती क्र.२.-वेबिनारचा बालकांस फायदा झाला असा प्रतिसाद देणाऱ्या | 14 |

| | | |
|---|---|---|
| | पालकांची माहिती | |
| iii | आकृती क्र.३ -वेबिनारचा बालकांस फायदा झाला असा प्रतिसाद देणाऱ्या पालकांची माहिती | 14 |
| iv | आकृती क्र.४-अशाप्रकारचे ऑनलाईन वेबिनार आयोजित करावे असे वाटणारे पालक | 15 |
| v | आकृती क्र.५-यापूर्वी आपण अशा ऑनलाईन वेबिनारचे आयोजन केले होते का ? या प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद | 16 |
| vi | आकृती क्र.६ -आयोजन केलेल्या ऑनलाईन वेबिनारसाठी विशेष तज्ज्ञ व विशेष शिक्षक यांनी निभावलेली भूमिका | 16 |
| vii | आकृती क्र.७ -आयोजन केलेल्या ऑनलाईन वेबिनारचा विशेष गरजा असणाऱ्या बालकांस झालेल्या फायद्याचे प्रमाण | 17 |
| viii | आकृती क्र.८ -आयोजन केलेल्या ऑनलाईन वेबिनारचा इतर बालकांस झालेल्या फायद्याचे प्रमाण | 18 |
| ix | आकृती क्र.९-आयोजन केलेल्या ऑनलाईन वेबिनारचा आपल्या कामात झालेल्या फायद्याचे प्रमाणाबाबत आयोजकांचे मत | 18 |
| x | आकृती क्र.१० -आयोजकांस ऑनलाईन वेबिनारचे आयोजन करण्यात आलेल्या अडचणीचा आढावा | 19 |
| xi | आलेख क्र.११-ऑनलाईन वेबिनारचे आयोजन करण्यात आलेल्या अडचणीचे स्वरूप | 19 |
| xii | आकृती क्र.१२ -यापुढे अशाप्रकारचे ऑनलाईन वेबिनार आयोजित करावे असे वाटते याचा गोषवारा | 20 |


1) **नवोपक्रमाचे शीर्षक**-

**विशेष गरजा असणाऱ्या बालकांच्या पालकांसाठी आयोजित**
**ऑनलाईन वेबिनारची यशस्विता**

**2)नवोपक्रमाची प्रस्तावना**-शाळेत येणारे प्रत्येक मूल शाळेत टिकावे व नियोजित वेळेत गुणवत्तापूर्ण शिकावे यासाठी शासनाकडून अनेक उपक्रम व योजना राबविण्यात येतात. प्राचीन शिक्षण पद्धतीत दुर्लक्षित राहिलेले बालक म्हणजे-विशेष गरजा असणारे बालक. निसर्गाचा प्रकोप म्हणून अपंगत्व असा ठपका ठेऊन त्यांच्या शारीरिक व मानसिक विकासाकडेही आईवडील व पालक दुर्लक्ष करत असत मग समाज आणि शासनाचा विषयच नाही. 'लोककल्याणकारी राज्याच्या' संकल्पनेतून तळागाळातील घटकांना सुखकर जीवन जगण्याचा व आपल्या प्राप्त क्षमतांचा विकास करण्याची हमी दिलेल्या भारतीय संविधानात अशा घटकासाठी विशेष सुविधा म्हणून अपंगत्वाच्या प्रकारनुसार 'विशेष शाळांची सोय' करण्यात आली.१९८६च्या शैक्षणिक धोरणानुसार 'प्रत्येक मुलाला चांगले शिक्षण मिळाले पाहिजे' अशी शिफारस करण्यात आली.विशेष शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे समाजातील स्थान व इतर सामान्य मुले व शिक्षकांना अपंगांच्या समस्यांची जाणीव होत नसल्याने दोघांच्याही 'सामाजिकरणाचा प्रश्न' निर्माण होऊ नये म्हणून 'अपंग एकात्मिक शिक्षण' संकल्पनेत माध्यमिक शाळेत सामान्य मुलांसोबत शिकणाऱ्या अपंग मुलांना त्यांच्या एका प्रकारच्या अपंगत्वाच्या प्रकारानुसार त्यांच्या गरजानुरूप किमान आठ विद्यार्थ्यांचे 'एक युनिट' स्थापन करून विशेष शिक्षक नेमून त्यांच्याद्वारे मार्गदर्शन करण्यात येऊ लागले..'सर्व शिक्षा अभियान' कार्यक्रमात' सर्वांना शिक्षण' देण्यासाठी' विशेष मुलांचे शिक्षण' हा उपक्रम ठळकपणे नमूद करून प्रथमच' विशेष शिक्षकांची नेमणूक' जिल्हास्तरावर अपंगत्वाच्या प्रकारानुसार 'विशेष तज्ज्ञ' नेमण्यात आले.प्रत्येक शाळेत जाऊन मुलांच्या किमान कौशल्याबाबत मार्गदर्शन 'फिरते विशेष शिक्षक' यांच्यामार्फत करण्यात येऊ लागले.'अपंगांसाठी विशेष कायदा १९९५' लागू झाल्यापासून त्यांच्या गरजांच्या विशेष पूर्तीबरोबरच त्यांचे योग्य समायोजन व्हावे यासाठी सामान्य शाळेत 'उताराचा रस्ता, विशेष कमोड स्वच्छतागृह 'आदी सुविधा शाळांना अनिवार्य करण्यात आल्या आणि 'समावेशित शिक्षण'खऱ्या अर्थाने सुरु झाले. यापूर्वीच्या विशेष शिक्षकांच्या विशेष गरजा असणाऱ्या मुलांसाठी विशेष अभ्यासक्रम व विशेष मार्गदर्शनाबरोबरच त्यांचे सामान्य मुलांसोबत आणि सामान्य

शिक्षकांच्या मदतीने समावेशन व्हावे म्हणून दोन्ही प्रकारच्या गरजा, समस्या व उपायोजना यासाठी शिक्षक व पर्यवेक्षीय यंत्रणेला विशेष प्रशिक्षण देण्यास सुरुवात झाली. या अंतर्गत शिक्षक, मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख व विस्तार अधिकारी यांना अशी प्रशिक्षणे देण्यात आली.

शालेय वातावरणात विशेष गरजा असणाऱ्या बालकांचे समावेशन झाले म्हणजे प्रश्न मिटला नाही कारण बालकांचा अधिकाधिक वेळ हा घरात,कुटुंबात व समाजात जातो. पालकांना या अशा विशिष्ट गरजा व समस्या अवगत करणे अगत्याचे होते. म्हणून अशा बालकांच्या आई-वडील,पालक यांना अशी प्रशिक्षणे अनिवार्य होती म्हणून २०१८-१९ या शैक्षणिक वर्षांपासून जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेत कार्यरत असलेल्या 'समावेशित शिक्षण' या उपक्रमांतर्गत 'पालक प्रशिक्षण' योजना सुरू करण्यात आली. प्रत्येक तालुका व केंद्रस्तरावर असे वर्ग घेण्यात आले.२०२०-२१या शैक्षणिक वर्षात कोविड प्रकोपामुळे सामाजिक अंतर पाळण्यासाठी शाळा व प्रशिक्षण अभावानेच आयोजित करण्यात आली. ऑनलाईन वर्गातून शिक्षक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करू लागले तर बहुतेक प्रशिक्षण व बैठकांचे आयोजनही ऑनलाईन पद्धतीने होऊ लागले. विशेष गरजा असणाऱ्या बालकांच्या पालकांचे असे ऑनलाईन पद्धतीने उद्बोधन करण्याबाबत आम्ही मा. प्राचार्य मॅडम यांचेसोबत चर्चा केली व तालुकानिहाय ऑनलाईन उद्बोधनाचे आयोजन करण्याचे ठरले. सर्व तालुक्यातील विशेष तज्ज्ञ शिक्षक व विशेष शिक्षक यांच्याशी चर्चा करून एका विशिष्ट विषयातील तज्ज्ञ मार्गदर्शकांना पाचारण करून अशा वर्गांचे तालुकानिहाय आयोजन करण्यात आले.

### 3)नवोपक्रमाची गरज व महत्त्व–

**उपक्रम निवडण्याचे कारण** -विशेष गरजा असणाऱ्या बालकांच्या पालकांना आपल्या पाल्यांच्या समस्या सोडविण्यासाठी व गरजा पूर्ण करण्यासाठी काहीबाबींची तात्काळ निकड व शास्त्रशुद्ध माहिती अत्यंत गरजेची असते. आपण शिक्षक व पर्यवेक्षीय यंत्रणेला सदर माहिती विशेष प्रशिक्षणातून दिलेली आहे. ज्या पालकांच्या संपर्कात बालक अत्याधिक वेळ राहते किंबहुना त्याच्या अन्न, वस्त्र, निवारा या प्राथमिक गरजा पूर्ण करण्याचे महत्वपूर्ण व त्या बाबत पालकांचे कोणतेही शास्त्रशुद्ध प्रशिक्षण झालेले नसल्याने व त्यांच्या दैनंदिन जीवनाच्या विवंचना प्राधान्याने असल्याने दुर्लभ कर्मकठीण कार्य करावे लागते. आपल्या शिक्षण विभागात उपलब्ध असलेल्या तज्ज्ञ व्यक्तींकडून त्यांना मार्गदर्शन मिळाल्यास त्यांच्या बालकांच्या जीवनात सुकरता येण्यास व पर्यायाने आपल्या गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी मदतच होणार आहे. पालकांना त्यांच्या बालकांच्या भवितव्यासाठी असे प्रशिक्षण आवश्यक आहे. कोविड प्रकोपामुळे आपण अनेक पालकांना एकत्र जमवून त्यांना उद्बोधन करणे शक्य नाहीव आपल्या उपलब्ध मनुष्यबळांमार्फत पालकांपर्यंत थेट पोहचणेही शक्य नाही. तेव्हा बदलत्या काळाची गरज म्हणून असे ऑनलाईन वर्ग घेण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे असे नियोजन करुन वर्ग घेण्यात आले.

**4)नवोपक्रमाचे वेगळेपण**:-सध्या शालेय शिक्षण विभागाच्या वतीने विशेष गरजा असणाऱ्या बालकांसाठी विशेष सुविधा व साधने पुरविण्यात येतात मात्र त्यासाधनांचा उचित वापर करण्याबाबत बालकांना उपयोग करण्याचे तंत्र शक्य होईलच असे नाही. त्यासाठी पालकांनाच त्याबाबत माहिती देणे गरजेचे आहे. बालकांच्या विशिष्ट गरजा व मस्यायाबाबतही हा पालकवर्ग जागरूक असेलच असे नाही. तेव्हा शासनाच्या योजनांची फलश्रुती होण्यासाठी आणि पर्यायाने सर्वांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे ध्येय गाठण्यासाठी पालकांचे उद्बोधन करणे गरजेचे आहे. अशी प्रशिक्षणे मागील दोन वर्षांपासून आपण सुरूही केली आहेत, तथापि, सद्यस्थितीत पालकांपर्यंत पोहचणे कठीण परंतू कोविडबाबत वेगळे मार्गदर्शन करण्यासाठी अत्यंत आवश्यक आहे.त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या स्मार्टफोनचा यथोचित उपयोग करून त्यांच्यापर्यंत महत्त्वाची माहिती देण्यासाठी असे वर्ग आयोजित करण्याचे ठरले. ऑनलाईन पद्धतीने असे वर्ग वा शास्त्रशुद्ध माहितीचे वर्ग आयोजन हे या नवोपक्रमाचे वेगळेपण आहे.

शासनाचे सक्तीचे आदेश नसताना व कोणतीही आर्थिक तरतूद नसताना उपलब्ध मनुष्यबळ व साधनाच्या मदतीने हे वर्ग ऑनलाईन या नवीन तंत्राच्या मदतीने आयोजन हे या वर्गांचे वेगळेपण आहे.

**5)नवोपक्रमाची उपयुक्तता**:- सदर उपक्रम घेतल्याने पुढीलप्रमाणे फायदे होतील म्हणून हा उपक्रम घेण्यात आला.

**A) नवोपक्रमाचे फायदे-पालकांसाठी:-**

1)पालकांना आपल्या दैनंदिन कामकाजाच्या वेळेतून वेगळा वेळ न देता थोडासा वेळ काढून यासाठी कोणताही प्रवास न करता व सामाजिक अंतराचे नियम पाळून ऑनलाईन पद्धतीने वर्गांचे आयोजन केल्याने त्यांना सुकरता येईल.

2) त्यांना वेगळा वेळ देण्याची आवश्यकता किंवा प्रवास खर्च करण्याची आवश्यकता नाही.

3) आपल्या बालकांच्या आरोग्य विषयक समस्या आणि त्यातही कोविड प्रादुर्भावात विशेष मार्गदर्शन मिळणार असल्याने त्यांना आपल्या पाल्यासाठी विशेष योजना करता येतील याचा उपयोग बालकांच्या प्रगतीसाठी उपयुक्त ठरणार आहे.

4) शासनाच्या उपलब्ध मनुष्यबळांचा उपयोग करून उद्बोधन केल्यास पालकांचे शासनाच्या योजनाबाबत उपयोग होईल आणि त्यांचे शासनाबाबत चांगले मत बनण्यास मदत होते.

**ब)नवोपक्रमाचे फायदे-शिक्षकांसाठी:-**

1) शिक्षकांना आपल्या विशेष गरजा असणाऱ्या बालकांच्या पालकांना आपल्या बालकांच्या समस्या व त्यावरील उपाय माहीत झाल्याने व त्यावर पालकांकडून उपाययोजना झाल्याने शिक्षकांच्या कामात सुलभता येते.

2)इतर तज्ज्ञ मार्गदर्शकांनी मांडलेल्या समस्या व यशोगाथा आपल्या दैनंदिन कामकाजात उपयोगात आणल्याने शिक्षक समृद्ध होण्यास मदत होते.

3) शिक्षकांना नवीन अनुभव मिळतो.

4) शिक्षकांना प्रेरणा मिळते.

5)शिक्षकांचे विद्यार्थी सक्षम होण्यास मदत होते.

**B) नवोपक्रमाचे फायदे- शासनासाठी**—

1. असे उपक्रम राबविण्याने पालक, बालक व शिक्षक समृद्ध झाल्याने शिक्षण व्यवस्थेस फायदा होण्यास मदत होते.

2) अशा आर्थिक मदतीशिवाय राबविलेल्या उपक्रमाने शासनाची बचत होते.

**6)नवोपक्रमाची उद्दिष्टे :-**

**1) नागपूर जिल्ह्यातील विशेष गरजा असणाऱ्या बालकांच्या पालकांसाठी ऑनलाईन वेबिनारचे नियोजन करणे.**

**2) अशा ऑनलाईन वेबिनारच्या आयोजनात येणाऱ्या समस्यांचा अभ्यास करणे.**

**3) पालकांना नवीन अनुभवांद्वारे समृद्ध करणे.**

**4) बालकांच्या विशेष गरजावर उपाययोजना करणे.**

**5) या अभिनव उपक्रमाबाबत सहभागी पालकांची मते अजमावणे**

**7)नवोपक्रमाचे नियोजन :-**

**i) उपक्रमपूर्व स्थितीचे निरीक्षण** -जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या 'समता विभागातर्गत' जिल्हा स्तरावरील समन्वयक व तालुकास्तरावरील विशेष तज्ज्ञ व विशेष शिक्षक यांच्यामार्फत विशेष गरजा असणाऱ्या बालकांसाठी विविध योजना व उपक्रम राबविण्यात येतात. शाळेत न येऊ शकणाऱ्या विद्यार्थ्यांना गृहभेटी देऊन विशेष मार्गदर्शन केले जाते. विशेष शिक्षक प्रत्यक्ष घरी जाऊन बालकांना व त्यांच्या पालकांना मार्गदर्शन करतात. अशा विद्यार्थ्यांचे समावेशन करणेबाबत वर्गशिक्षक, मुख्याध्यापक व पर्यवेक्षीय यंत्रणा यांना आपण मार्गदर्शन केलेले आहे. कोविड प्रकोपामुळे शाळा बंद आहेत तर सामान्य मुलांच्या शिक्षणासाठी विविध प्रकारचे ऑनलाईनपद्धतीने प्रयत्न केले जात आहेत.तथापि विशेष गरजा असलेल्या बालकांसाठी ऑनलाईन वर्ग, स्वाध्याय इ. प्रयत्न अपुरे पडताना दिसतात. त्यांच्या पालकांनाही एकत्र जमवून असे प्रशिक्षण देणे शक्य नव्हते म्हणून त्यांच्यासाठी अशा ऑनलाईन वेबिनारचे आयोजन करण्यात आले.

**ii)संबंधित व्यक्तींशी /तज्ज्ञांशी चर्चा** - मा.प्राचार्या श्रीमती हर्षलता बुराडे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा शिक्षण व प्रशिक्षणसंस्थेचे समता विभाग जिल्हा समन्वयक श्री. पांडे व श्रीमती भावे यांच्याशी या नवोपक्रमाबाबत प्राथमिक स्वरूपाची चर्चा करून सर्व तालुक्यांच्या विशेष तज्ज्ञ यांची ऑनलाईन बैठक घेऊन या वेबिनारच्या आयोजनाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यांच्या परिचयाच्या तज्ज्ञ मार्गदर्शकांशी चर्चा करून दिनांक व वेळ ठरविण्याबाबत सूचना देण्यात आल्या.

**iii)आवश्यक साधनांचा विचार**—प्रस्तुत नवोपक्रमासाठी नागपूर जिल्ह्यातील सर्व पालकांचा विशेषतः विशेष गरजा असणाऱ्या बालकांच्या पालकांचा समावेश करण्यात आला. त्यासाठी तालुकास्तरावर कार्यरत विशेष तज्ज्ञ व विशेष शिक्षक यांना संबंधित विषयाच्या तज्ज्ञ मार्गदर्शकांशी संपर्क करणे, त्यांच्या नियोजनानुसार वेबिनारची दिनांक व वेळ ठरविणे, त्यानुसार सर्व संबंधित पालकांशी संपर्क करणे व त्यांच्या उपस्थितीबाबत दक्षता घेण्याची जबाबदारी या तालुकास्तरीय तज्ज्ञ व विशेष शिक्षकांकडे देण्यात आली.

वेबिनार ऑनलाईन पद्धतीने घेऊन त्याचा इतर पालकांना इतर वेळेत उपयोग व्हावा यासाठी त्या वेबिनारचे यू-ट्यूबवर ऑनलाईन streaming करण्यात आले. यासाठी डाएट संस्थेचा IT विभाग यांनी नियोजनाप्रमाणे google link तयार करून त्याचे ऑनलाईन streaming करण्यात आले.

**iv)करावयाच्या कृतीचा क्रम** —

1.ऑनलाईन जिल्हास्तरीय नियोजन बैठक.

2.तालुकास्तरीय नियोजन:- तज्ज्ञ मार्गदर्शक संपर्क व वेबिनार दिनांक व वेळ नियोजन.

3.तालुकास्तरीय नियोजनानुसार google link.

4. नियोजन व कार्यक्रम पत्रिका.

5..प्रत्यक्ष ऑनलाईन वेबिनार कार्यक्रम

5.कार्यक्रमाचा आढावा (लिंकद्वारे ):-पालक व विशेष तज्ज्ञ व विशेष शिक्षक यांना google link देऊन प्रतिसाद नोंद.

**v)कार्यवाहीचे टप्पे**— सदर नवोपक्रमाच्या कार्यवाहीचे टप्पे (वेळापत्रक ) पुढीलप्रमाणे-

**कोष्टक क्र.1 नवोपक्रम कार्यवाहीचे टप्पे (वेळापत्रक)**

| अ.क्र. | कार्याचा तपशील | कालावधी |
|---|---|---|
| 1. | जिल्हास्तरीय नियोजन बैठक | फेब्रुवारी2021 |
| 2. | तालुकास्तरीय नियोजन बैठका | फेब्रुवारी2021 |
| 3. | तज्ज्ञ मार्गदर्शक संपर्क | फेब्रुवारी2021 अखेर |
| 4. | पालक संपर्क | तालुका नियोजनानुसार |
| 5. | प्रत्यक्ष ऑनलाईन वेबिनार आयोजन | तालुका नियोजनानुसार |
| 6. | कार्यक्रमाचा आढावा (लिंकद्वारे ) | ऑक्टोबर 2021 अखेर |
| 7. | माहिती संकलन | ऑक्टोबर2021 अखेर |
| 8. | अहवाल लेखन | 08/11/2021 |
| 9. | अहवाल सादरीकरण | 09/11/2021 |

**vi) उपक्रमोत्तर स्थितीचे निरीक्षण** :- राज्यात सर्वात प्रथम घेण्यात आलेल्या या उपक्रमाचे उपक्रमोत्तर स्थितीचे निरीक्षण करण्यासाठी ऑनलाईन वेबिनारला उपस्थित सर्व पालकांना व सर्व तालुक्यातील विशेष तज्ञ व विशेष शिक्षकांना **WHATSAPP लिंक** दिली देण्यात आली पाच दिवसाच्या कालावधीत भरलेल्या **लिंकवरील प्रतिसादाचे विश्लेषण** करण्यात आले.

**vii)उपक्रमासाठी इतरांची मदत**—

1.या उपक्रमाच्या आयोजनासाठी आवश्यक google link व You-tube link तयार करण्यासाठी आमच्या संस्थेतील IT विभागाने मदत केली.

2.या उपक्रमाचा मुख्य घटक म्हणजे पालकांना शास्त्रशुद्ध मार्गदर्शन .यासाठी संपर्कातील राज्यातील संबंधित विषयातील मार्गदर्शकांची विशेष मदत झाली.

मा.प्राचार्य, वरिष्ठ अधिव्याख्याता,अधिव्याख्याता,विषय सहाय्यक ,विषय साधन व्यक्ती व संपूर्ण स्टाफ.

**viii)उपक्रमासाठी सादर करावयाचे पुरावे.** —सदर उपक्रमाची यशस्विता तपासण्यासाठी पुढीलप्रमाणे पुरावे आहेत.-

i.उपस्थित पालकांना दिलेली google link आणि You tube link.

ii.उपस्थित पालकांची उपक्रमाच्या यशस्वितेबाबत मते अजमावण्यासाठी व विशेष शिक्षक व विशेष तज्ञ यांची मते अजमावण्यासाठी दिलेली google link.

**8)नवोपक्रमाची कार्यपध्दती :-**

**i)पूर्वस्थितीची निरीक्षणे व त्याच्या नोंदी.** — नागपूर जिल्ह्यातील विशेष गरजा असणाऱ्या बालकांच्या पालकांसाठी ऑनलाईन वेबिनारचे आयोजन हा आतापर्यंत आयोजित न केलेला पूर्णपणे नवीन असा उपक्रम असल्याने त्याची पूर्वस्थितीची निरीक्षणे नोंदविता येणार नाहीत.तरी पारंपरिक पालक प्रशिक्षण आयोजित करताना येणाऱ्या अडचणी ऑनलाईन प्रशिक्षणातील अडचणी व त्यावर करावयाच्या उपाययोजना यांचा विचार नियोजन करताना उपयोगी पडला.त्याची निरीक्षणे पुढीलप्रमाणे आहेत-

1)पालकवर्ग हा पूर्णपणे स्वतंत्र असून त्यावर आपले प्रत्यक्ष कुठलेही बंधन वा थेट संपर्क नसतो त्यामुळे त्यांच्याशी सदर ऑनलाईन वेबिनारबाबत संपर्क करून त्यांना वेबिनारला उपस्थित राहण्याबाबत पाठपुरावा करण्यासाठी विशेष शिक्षकांनी काही विशिष्ट लोकांशी संपर्क करण्याचे नियोजन करण्यात आले.

2)ऑनलाईन वेबिनारसाठी सर्वात महत्त्वाचा अनिवार्य घटक म्हणजे मोबाईल व वेबिनारसाठी आवश्यक इंटरनेट जोडणी.अनेक पालकांकडे स्मार्ट फोन उपलब्ध नाहीत आणि असले तरी इंटरनेट रेंज नसणे ही नित्याची समस्या आहे. यावर मात करण्यासाठी अशा गरजू पालकांना इतर पालकांशी जोड्या लावण्याच्या सूचना देण्यात आल्या.

3) वेबिनारला मार्गदर्शन करणारे तज्ज्ञ व लाभ घेणारे पालक यांना वेळेवर उपस्थित राहण्यासाठी वारंवार पाठपुरावा करण्याचे नियोजन करण्यात आले.

ii)कार्यवाहीदरम्यान निरीक्षणे व माहिती संकलन- **विशेष गरजा असणाऱ्या बालकांच्या पालकांसाठी ऑनलाईन वेबिनार आयोजित करताना** ठरल्यापासून कार्यक्रम पूर्ण होईपर्यंत पुढील माहिती दिसून आली.

**कोष्टक क्र.२ -ऑनलाईन वेबिनार तालुकानिहाय नियोजन**

| अ.क्र. | तालुका | वेबिनारचा दिनांक | वेबिनारचा विषय | वेबिनारच्या मार्गदर्शकांचे नाव |
|---|---|---|---|---|
| 1 | DIET NAGPUR | 16.3.2021 | आजच्या वर्गातील समावेशित शिक्षण | NATIONAL INSTITUTE FOR EMPOWERMENT PERSON WITH INTELLECTUAL DISABILITY, NAVI MUMBAI. |
| 1 | नागपूर (ग्रामीण) | 02.7.2021 | Cross Disability approach for Early identification and intervention | डॉ.सुमित कांबळे |
| 2. | हिंगणा | 06.7.2021 | Sports as a Medicine in Inclusive Education | डॉ. संगीता टोकणे |
| 3. | कळमेश्वर | 16.3.2021 | वाचा आणि भाषा. कौशल विकास | डॉ.प्रफुल्ल शिंदे |
| 4. | काटोल | 05.7.2021 | विशेष गरजा असणाऱ्या मुलांच्या जीवनात Sensory and Play चे महत्त्व . | डॉ.अश्विनी दहाट |
| 5. | नरखेड | 14.7.2021 | मेंदूचा पक्षाघात असणाऱ्या बालकांचे शैक्षणिक समायोजन | डॉ.विठ्ठल पुरी,प्रा.जगन मुद्गते |
| 6. | सावनेर | 15.7.2021 | Common Eye Problems in Children | डॉ. जयंत कडस्कर |
| 7. | रामटेक | 26.3.2021 | Role of Multiple Disability in inclusive Education | अभिनव कुमार |
| 8. | उमरेड | 24.7.2021 | Visual Perception -Vision Beyond Activity | डॉ.गणेश ताजने |
| 9. | पारशिवनी | 29.06.2021 | कोरोना काळातील दिव्यांग बालकांच्या पालकांचे मानसिक स्वास्थ्य. | अपर्णा भालेराव |
| 10 | KUHI | 13.7.2021 | दिव्यांग मुलांकरिता रोगप्रतिकारशक्ती वाढविण्याकरीता संतुलीत आहार. | श्रीमती. शालीनी कोटमकर |
| 10. | कामठी | 16.7.2021 | अध्ययन अक्षमता | कु.ज्वाला खोब्रागडे |
| 11. | भिवापूर | 28.7.2021 | Behaviour Modification | डॉ.विनायक नागदेवते |
| 12. | शहर साधन केंद्र-1 | 20.7.2021 | शीघ्र हस्तक्षेप संकल्पना-गरज,पुनर्वसन तज्ज्ञांची भूमिका ,पालक व विशेष शिक्षकांची भूमिका | श्री. विरेंद्र बांते |
| 13. | शहर साधन केंद्र-2 | 23.7.2021 | दिव्यांग व्यक्तींच्या सक्षमीकरणासाठी शासकीय योजना व कायदे. | श्री. संजय पुसाम |
| 14 | शहर साधन केंद्र-3 | 14.7.2021 | दिव्यांग किशोरवयीन मुलामुलीधील वर्तन समस्या व व्यवस्थापन | डॉ. जया शिवलकर |
| 15 | शहर साधन केंद्र-4 | 27.7.2021 | संगीत चिकित्सेचा दिव्यांग मुलांच्या शैक्षणिक कार्यात वापर. | श्री. प्रविण शेवडे |
| 17 | शहर साधन केंद्र-5 | 05.8.2021 | दिव्यांग विद्यार्थ्यांचे वर्गव्यवस्थापन व शैक्षणिक कौशल्य विकास. | श्री. संजय काकडे |

**कोष्टक क्र.३ -ऑनलाईन वेबिनार तालुकानिहाय पालक उपस्थिती**

| अ.क्र. | तालुक्याचे नाव | अपेक्षित सहभागी | google उपस्थित | You-tube |
|---|---|---|---|---|

| | | पालक संख्या | पालक संख्या | प्रेक्षक संख्या |
|---|---|---|---|---|
| 1 | नागपूर (ग्रामीण) | 15 | 14 | 743 |
| 2. | हिंगणा | 22 | 20 | 580 |
| 3. | कळमेश्वर | 26 | 25 | 602 |
| 4. | काटोल | 15 | 14 | 524 |
| 5. | नरखेड | 15 | 12 | 321 |
| 6. | सावनेर | 35 | 35 | 211 |
| 7. | रामटेक | 19 | 15 | 592 |
| 8. | उमरेड | 35 | 35 | 492 |
| 9. | पारशिवनी | 37 | 36 | 1039 |
| 1०. | कुही | 34 | 34 | 1368 |
| 11. | कामठी | 40 | 35 | 947 |
| 12. | भिवापूर | 50 | 34 | 434 |
| 13. | शहर साधन केंद्र-१ | 37 | 37 | 1278 |
| 14. | शहर साधन केंद्र-२ | 24 | 24 | 1389 |
| 15 | शहर साधन केंद्र-३ | 33 | 33 | 1244 |
| 16 | शहर साधन केंद्र-4 | 35 | 34 | 1036 |
| 17 | शहर साधन केंद्र-5 | 37 | 36 | 1211 |
| | **एकूण** | 509 | 473 | 14011 |

**iii)उपक्रम पूर्ण झाल्यावर आलेली निरीक्षणे व त्याच्या नोंदी.** –या जिल्हास्तरीय online नवोपक्रमानंतर सहभागी पालकांची मते जाणून घेण्यासाठी दि.२२ ऑक्टोबर ते ३१ ऑक्टोबर २०२१ या कालावधीसाठी **Whats app** लिंक देऊन माहिती संकलन केली व त्याच्या निरीक्षणांच्या नोंदी केल्या.


**8)नवोपक्रमाची यशस्विता /फलनिष्पत्ती (उद्दिष्टांनुसार ) :-**

**i)पूर्वस्थितीची निरीक्षणे व त्याच्या नोंदी.** नवोपक्रमाची पूर्वस्थिती जाणून घेण्यासाठी पालकांना दिलेल्या google link मध्ये यापूर्वी आपण अशा ऑनलाईन वेबिनारचा लाभ घेतला होता काय ? असा प्रश्न विचारण्यात आला.त्याचा प्रतिसाद पुढीलप्रमाणे आला,;-

**अ)पालकांच्या प्रतिसादांचे विश्लेषण**

**४) कोष्टक क्र.4 यापूर्वी ऑनलाईन वेबिनारचा लाभ घेतलेल्या पालकांची मते दर्शविणारा तक्ता.**

| अ.क्र. | यापूर्वी ऑनलाईन वेबिनारचा लाभ घेतलेल्या पालकांची | | यापूर्वी ऑनलाईन वेबिनारचा लाभ न घेतलेल्या पालकांची | |
|---|---|---|---|---|
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| 1 | 45 | 11.6 | 342 | 88.4 |





**आकृती क्र.१- वेबिनारचा फायदा झाला असा प्रतिसाद देणाऱ्या पालकांची माहिती**

निरीक्षणे- या online वेबिनारचा मोठ्या प्रमाणात फायदा झाला असा प्रतिसाद नोंदविणाऱ्या पालकांचे प्रमाण अधिक आहे.

**आपण ऑनलाईन उपस्थित असलेल्या वेबिनारचा आपल्या पाल्यास किती प्रमाणात फायदा झाला असे तुम्हाला वाटते?** या प्रश्नास मिळालेला प्रतिसाद-

**कोष्टक क्र.5 वेबिनारचा आपल्या पाल्यास फायदा झाला असा प्रतिसाद देणाऱ्या पालकांची माहिती**

| **वेबिनारचा पाल्यास फायद्याचे प्रमाण** | ०० ते २५ टक्के. | २६ ते ५० टक्के. | ५१ ते ७५ टक्के. | ७६ ते १०० टक्के. |
|---|---|---|---|---|
| एकूण संख्या | 121 | 178 | 68 | 20 |
| टक्केवारी | 31 | 46 | 18 | 5 |





**आकृती क्र.२.वेबिनारचा बालकांस फायदा झाला असा प्रतिसाद देणाऱ्या पालकांची माहिती**

निरीक्षणे- या online वेबिनारचा बालकांस मोठ्या प्रमाणात फायदा झाला असा प्रतिसाद नोंदविणाऱ्या पालकांचे प्रमाण अधिक आहे

आपण ऑनलाईन उपस्थित असलेल्या वेबिनारच्या विषयाचा इतर पाल्यास आपण फायदा करून दिला का ? या प्रश्नास मिळालेला प्रतिसाद-

**कोष्टक क्र.6 वेबिनारचा इतर पाल्यास फायदा झाला असा प्रतिसाद देणाऱ्या पालकांची माहिती**

| अ.क्र. | वेबिनारच्या विषयाचा इतर पाल्यास आपण फायदा करून दिला | वेबिनारच्या विषयाचा इतर पाल्यास आपण फायदा करून दिला नाही |
|---|---|---|
| संख्या | 252 | 135 |
| टक्केवारी | 34.9 | 65.1 |





**आकृती क्र.३ .वेबिनारचा बालकांस फायदा झाला असा प्रतिसाद देणाऱ्या पालकांची माहिती**

निरीक्षणे- या online वेबिनारचा इतर बालकांस मोठ्या प्रमाणात फायदा झाला असा प्रतिसाद नोंदविणाऱ्या पालकांचे प्रमाण 65.1 टक्के आहे.

**अशाप्रकारचे ऑनलाईन वेबिनार आयोजित करावे असे आपणास वाटते का? या प्रश्नास मिळालेला प्रतिसाद-**

**कोष्टक क्र.7 अशाप्रकारचे ऑनलाईन वेबिनार आयोजित करावे असे वाटणारे पालक माहिती**

| अ.क्र. | अशाप्रकारचे ऑनलाईन वेबिनार आयोजित करावे असे वाटणारे पालक | अशाप्रकारचे ऑनलाईन वेबिनार आयोजित करावे असे न वाटणारे पालक |
|---|---|---|
| संख्या | 352 | 35 |
| टक्केवारी | 91 | 09 |



**आकृती क्र.४ . अशाप्रकारचे ऑनलाईन वेबिनार आयोजित करावे असे वाटणारे पालक**

निरीक्षणे- अशाप्रकारचे ऑनलाईन वेबिनार आयोजित करावे असे वाटणारे पालक 91 टक्के आहेत.


**कोणत्या विषयाचे ऑनलाईन वेबिनार आयोजित करावे असे आपणास वाटते ? या प्रश्नावर मिळालेला प्रतिसाद**

Vocational Training, SPEECH THERAPY, सामाजिक सुरक्षितता, Physiotherapy, पाल्याच्या संगोपनासाठी व शिक्षणासाठी योग्य विषय, Speech and language, पूरक आहार, व्यायाम, दिव्यांग बालकाचा व्यावसायिक विकास कसा करावा, Rehabilitation & Therepy training.

## ब)विशेष तज्ज्ञ व विशेष शिक्षक यांच्या प्रतिसादांचे विश्लेषण

**कोष्टक क्र.8 यापूर्वी अशा ऑनलाईन वेबिनारचे आयोजन केले होते का ? या प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद**


| | होय | नाही |
|---|---|---|
| संख्या | 08 | 54 |
| टक्केवारी | 12.9 | 87.1 |




**आकृती क्र.५ यापूर्वी आपण अशा ऑनलाईन वेबिनारचे आयोजन केले होते का ? या प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद**

**कोष्टक क्र.9 -आयोजन केलेल्या ऑनलाईन वेबिनारसाठी विशेष तज्ज्ञ व विशेष शिक्षक यांनी निभावलेली भूमिका**


| | नियोजन | पालक संपर्क | सूत्रसंचालन | अन्य |
|---|---|---|---|---|
| संख्या | 9 | 25 | 10 | 16 |
| टक्केवारी | 18 | 50 | 20 | 32 |




**आकृती क्र.६ आयोजन केलेल्या ऑनलाईन वेबिनारसाठी विशेष तज्ज्ञ व विशेष शिक्षक यांनी निभावलेली भूमिका**

**कोष्टक क्र.10 आयोजन केलेल्या ऑनलाईन वेबिनारचा विशेष गरजा असणाऱ्या बालकांस झालेल्या फायद्याचे प्रमाण**


| **वेबिनारचा पाल्यास झालेल्या फायद्याचे प्रमाण** | ०० ते २५ टक्के. | २६ ते ५० टक्के. | ५१ ते ७५ टक्के. | ७६ ते १०० टक्के. |
|---|---|---|---|---|
| एकूण संख्या | 17 | 30 | 15 | 00 |
| टक्केवारी | 24.2 | 48.4 | 27.4 | 00 |




**आकृती क्र.७ आयोजन केलेल्या ऑनलाईन वेबिनारचा विशेष गरजा असणाऱ्या बालकांस झालेल्या फायद्याचे प्रमाण**

**कोष्टक क्र.11-आयोजन केलेल्या ऑनलाईन वेबिनारचा इतर बालकांस  झालेल्या फायद्याचे प्रमाण**


| **वेबिनारचा इतर बालकांस झालेल्या फायद्याचे प्रमाण** | ०० ते २५ टक्के. | २६ ते ५० टक्के. | ५१ ते ७५ टक्के. | ७६ ते १०० टक्के. |
|---|---|---|---|---|
| एकूण संख्या | 23 | 30 | 9 | 00 |
| टक्केवारी | 14.5 | 48.4 | 37.1 | 00 |




**आकृती क्र.८    आयोजन केलेल्या ऑनलाईन वेबिनारचा इतर बालकांस  झालेल्या फायद्याचे प्रमाण**

**कोष्टक क्र.12- आयोजन केलेल्या ऑनलाईन वेबिनारचा आपल्या कामात झालेल्या फायद्याचे प्रमाणाबाबत आयोजकांचे मत**


| वेबिनारचा आपल्या कामात झालेल्या फायद्याचे प्रमाणाबाबत आयोजकांचे मत | ०० ते २५ टक्के. | २६ ते ५० टक्के. | ५१ ते ७५ टक्के. | ७६ ते १०० टक्के. |
|---|---|---|---|---|
| एकूण संख्या | 14 | 21 | 23 | 04 |
| टक्केवारी | 22.6 | 37.1 | 33.9 | 04 |




**आकृती क्र.९ आयोजन केलेल्या ऑनलाईन वेबिनारचा आपल्या कामात झालेल्या फायद्याचे प्रमाणाबाबत आयोजकांचे मत**

**कोष्टक क्र.13-आयोजकांस ऑनलाईन वेबिनारचे आयोजन करण्यात आलेल्या अडचणीचा आढावा**

| | होय | नाही |
|---|---|---|
| संख्या | 30 | 32 |
| टक्केवारी | 48.38 | 52.12 |





**आकृती क्र.१० आयोजकांस ऑनलाईन वेबिनारचे आयोजन करण्यात आलेल्या अडचणीचा आढावा**

**कोष्टक क्र.14 ऑनलाईन वेबिनारचे आयोजन करण्यात आलेल्या अडचणीचे स्वरूप**

| **अ.क्र.** | **अडचणीचे स्वरूप** | **प्रतिसाद संख्या** | **शेकडा प्रमाण** |
|---|---|---|---|
| 1 | नियोजन करताना | 3 | 05 |
| 2 | तज्ज्ञ मार्गदर्शक ठरवताना | 2 | 03 |
| 3 | ऑनलाईन नियोजन | 10 | 16.12 |
| 4 | पालकांची उपस्थिती | 30 | 48.38 |
| 5 | इतर | 17 | 27.50 |


| अ.क्र. | अडचणीचे स्वरूप | प्रतिसाद संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 1 | नियोजन करताना | 3 | 05 |
| 2 | तज्ज्ञ मार्गदर्शक ठरवताना | 2 | 03 |
| 3 | ऑनलाईन नियोजन | 10 | 16.12 |
| 4 | पालकांची उपस्थिती | 30 | 48.38 |
| 5 | इतर | 17 | 27.50 |




**आलेख क्र.११ ऑनलाईन वेबिनारचे आयोजन करण्यात आलेल्या अडचणीचे स्वरूप**

**कोष्टक क्र.15 यापुढे अशाप्रकारचे ऑनलाईन वेबिनार आयोजित करावे असे वाटते याचा गोषवारा**

| | होय | नाही |
|---|---|---|
| संख्या | 60 | 02 |
| टक्केवारी | 97 | 03 |




**आकृती क्र.१२ यापुढे अशाप्रकारचे ऑनलाईन वेबिनार आयोजित करावे असे वाटते याचा गोषवारा**

**iv)कार्यवाहीत आलेल्या अडचणी** -विशेष तज्ज्ञ व विशेष शिक्षक हे पारंपरिक पद्धतीने शाळाभेट,वर्गभेट फार तर गृहभेट किंवा बालकभेट करून मार्गदर्शन करतात.राज्यात लॉकडाऊन सुरु असल्याने शाळा बंद आहेत.सामाजिक अंतर पाळणे बंधनकारक असल्याने गृहभेटी करायलाही मर्यादा येत होत्या.online webinar आयोजित केल्याने त्यामधून काही अडचणी समोर आल्या.

१) पालक संपर्क अडचणी
२) विषयानुरूप तज्ज्ञ मार्गदर्शक मिळणे.
३) online नियोजन
४) पालकांची उपस्थिती.
५) कार्यक्रमादरम्यान online अडचणी.
७) Online लिंकद्वारे प्रतिसाद कमी मिळाला.

**v)माहितीचे विश्लेषण:आलेख,तक्ते:- विशेष गरजा असणाऱ्या बालकांच्या पालकांसाठी आयोजित केलेल्या online webinar च्या नवोपक्रमाचे विश्लेषण करण्यासाठी** जिल्ह्यात राबविण्याच्या नियोजनापासून तर आढावा लिंक भरेपर्यंत विविध टप्प्यांवर निरीक्षणे,कृती,प्रश्नावली या सर्वेक्षण साधंनांद्वारे संकलन केलेल्या माहितीचे विश्लेषण करून त्यावरून तक्ते ,आलेख व आकृत्या काढून त्यावरून निरीक्षणे नोंदवून माहितीचे विश्लेषण करण्यात आले.प्रस्तुत अहवालात तक्ते क्र.1 ते 05,आलेख क्र.1 ते 12 आणि आकृती क्र.1 ते 7 यांचा उपयोग करून निरीक्षणे,अन्वयार्थ व निष्कर्ष काढण्यात आले.

**माहितीचे अन्वयार्थ :-उद्दिष्ट क्र.1)नागपूर जिल्ह्यातील विशेष गरजा असणाऱ्या बालकांच्या पालकांसाठी ऑनलाईन वेबिनारचे नियोजन करणे.**प्रस्तुत नवोपक्रमात नियोजनाप्रमाणे तालुकास्तर व शहर साधन केंद्रस्तरावर केलेल्या नियोजनानुसार ऑनलाईन वेबिनारचे आयोजन करण्यात आले.

**उद्दिष्ट क्र 2) अशा ऑनलाईन वेबिनारच्या आयोजनात येणाऱ्या समस्यांचा अभ्यास करणे.** प्रस्तुत नवोपक्रमात नियोजनाप्रमाणे तालुकास्तर व शहर साधन केंद्रस्तरावर आयोजित केलेल्या ऑनलाईन वेबिनारमधून तक्ता . व आकृती नुसार पुढील समस्या समोर आल्या.

१) पालक संपर्क अडचणी
२) विषयानुरूप तज्ज्ञ मार्गदर्शक मिळणे.
३) online नियोजन
४) पालकांची उपस्थिती.
५) कार्यक्रमादरम्यान online अडचणी.
७) Online लिंकद्वारे प्रतिसाद कमी मिळाला.

**उद्दिष्ट क्र.3)पालकांना नवीन अनुभवांद्वारे समृद्ध करणे.या मूळ उद्दिष्टासाठी आयोजित केलेल्या online webinar च्या आयोजनानंतर पालकांना पुढीलप्रमाणे अनुभव मिळाल्याचे दिसून येते.**

**कोष्टक व आकृती नुसार पालकांची पुढील मते स्पष्ट झाली.**

**यापूर्वी विशेष गरजा असणाऱ्या बालकांच्या पालकांसाठी आयोजित online वेबिनारचा लाभ न घेतलेल्या पालकांची संख्या 87.6 टक्के असून अशा online वेबिनारचा लाभ न घेतलेल्या पालकांची संख्या 12.4 टक्के आहे.याचा अर्थ फारच कमी लोकांनी अशा वेबिनारचा लाभ घेतला होता.तेव्हा पालकांना एक नवीन अनुभव आला.**

**कोष्टक व आकृती नुसार पालकांची पुढील मते स्पष्ट झाली.**

या online वेबिनारचा मोठ्या प्रमाणात फायदा झाला असा प्रतिसाद नोंदविणाऱ्या पालकांचे प्रमाण अधिक आहे.

**कोष्टक व आकृती नुसार पालकांची पुढील मते स्पष्ट झाली.**

या online वेबिनारचा बालकांस मोठ्या प्रमाणात फायदा झाला असा प्रतिसाद नोंदविणाऱ्या पालकांचे प्रमाण अधिक आहे

**उद्दिष्ट क्र. 4)बालकांच्या विशेष गरजावर उपाययोजना करणे.** या online वेबिनारचा इतर बालकांस मोठ्या प्रमाणात फायदा झाला असा प्रतिसाद नोंदविणाऱ्या पालकांचे प्रमाण 65.1 टक्के आहे

**उद्दिष्ट क्र. 5)या अभिनव उपक्रमाबाबत सहभागी पालकांची मते अजमावणे.**

या online वेबिनारचा मोठ्या प्रमाणात फायदा झाला असा प्रतिसाद नोंदविणाऱ्या पालकांचे प्रमाण अधिक आहे.
या online वेबिनारचा इतर बालकांस मोठ्या प्रमाणात फायदा झाला असा प्रतिसाद नोंदविणाऱ्या पालकांचे प्रमाण 65.1 टक्के आहे.

अशाप्रकारचे ऑनलाईन वेबिनार आयोजित करावे असे वाटणारे पालक 91 टक्के आहेत.

**10)नवोपक्रमाच्या यशस्वितेवरून मांडलेल्या शिफारशी :-** या नवोपक्रमाची यशस्विता व आलेल्या निष्कर्षांवरून पुढील शिफारशी मांडता येतील-

**अ) जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेसाठी शिफारशी :-**

1.जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेने विशेष गरजा असणाऱ्या बालकांच्या पालकांसाठी ऑनलाईन वेबिनारद्वारे उपलब्ध उपक्रमांना व्यापक प्रसिद्धी द्यावी.

2.जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेने पालकांसाठी विविध विषयावर दरमहा वेबिनार आयोजित आयोजन करावेत.

3.जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेने ऑनलाईन कार्यशाळांचे आयोजन करावे.

**ब)विशेष शिक्षकांसाठी शिफारशी:-**

1.शिक्षकांनी आपल्या ज्ञान क्षेत्रात अद्ययावत राहण्यासाठी सतत प्रयत्नरत राहावे.

2.विशेष शिक्षकांनी विद्यार्थ्यांसाठी सतत विविध प्रयोग राबवून त्यांना समृध्द करावे.

3.विशेष शिक्षकांनी अध्ययन अध्यापन प्रक्रियेत होत असलेल्या परिवर्तनाबाबत सजग राहावे.

**11)समारोप:-** विशेष गरजा असणाऱ्या बालकांच्या पालकांसाठी आयोजित केलेल्या online webinar च्या नवोपक्रमाचे विश्लेषण करण्यासाठी जिल्ह्यात राबविण्याच्या नियोजनापासून तर आढावा लिंक भरेपर्यंत विविध टप्प्यांवर निरीक्षणे,कृती,प्रश्नावली या सर्वेक्षण साधनांद्वारे संकलन केलेल्या माहितीचे विश्लेषण करून त्यावरून तक्ते ,आलेख व आकृत्या काढून त्यावरून निरीक्षणे नोंदवून माहितीचे विश्लेषण करण्यात आले.त्यावरून निष्कर्ष मांडून शिफारशी मांडण्यात आल्या.यामध्ये शिक्षक व आयोजकांना एक नवीन अनुभव प्राप्त झाला व यशस्विता प्राप्त झाली.

## 12) संदर्भसूची:-

**अ) संदर्भसूची**


1.संपादक,जरग नामदेवराव (ऑक्टोबर 2012)मुख्याध्यापक मार्गदर्शिका (भाग-2) प्रथमावृत्ती,पुणे, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद

2.संपादक,जरग नामदेवराव (फेब्रुवारी 2013)प्रभावी शालेय व्यवस्थापन,राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान मुख्याध्यापक प्रशिक्षण ,प्रथमावृत्ती पुणे, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद

3.संपादक,जरग नामदेवराव (जून 2012) केंद्रसंमेलन मार्गदर्शिका,प्रथमावृत्ती
पुणे, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद

4.संपादक,जरग नामदेवराव (जुलै 2012)लघुसंशोधन मार्गदर्शिका ,प्रथमावृत्ती
पुणे, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद

5.संपादक,जरग नामदेवराव (जुलै 2012)कृतिसंशोधन मार्गदर्शिका ,प्रथमावृत्ती
पुणे, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद

6.पारसनीस हेमलता (नोव्हेंबर -2006 ) शैक्षणिक संशोधन :माहिती संकलन व साधने,पुणे, नित्य नूतन प्रकाशन

7.पंडित बी.बी. (2005) शिक्षणातील संशोधन (संख्यात्मक व गुणात्मक) पुणे,नित्य नूतनप्रकाशन

8.भिंताडे वि.रा. (2004) शैक्षणिक संशोधन पध्दती (आ.3) पुणे, नूतन प्रकाशन

10.मुळे रा.शं.आणि उमाठे वि.तु.(1998) शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे (आ.3)औरंगाबाद ,विद्या बुक प्रकाशन


**ब) परिशिष्टे**

| अ.क्रं. | तपशील | पृष्ठ क्रं. |
|---|---|---|
| 1. | कार्यक्रम पत्रिका | 25 |


समग्र शिक्षा
सबको शिक्षा, अच्छी शिक्षा
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था रविनगर नागपूर अंतर्गत
गट साधन केंद्र भिवापूर तर्फे आयोजित वेबीनार
प्रेरणा व मार्गदर्शक
Topic :- Behaviour Modification
बुधवार, दि. 28/07/2021
वेळ :– 4 ते 5:30
मा. हर्षलता बुराडे, प्राचार्या
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण
संस्था रविनगर नागपूर
मा. विजय कोकोडे,
गटशिक्षणाधिकारी, पं.स. भिवापूर
Special Needs Issues in Children
MEDICAL
BEHAVIOR
LEARNING
MENTAL HEALTH
DEVELOPMENT
डॉ.गंगाधर वाळले (ज्येष्ठ अधिव्याख्याता)
समता विभाग प्रमुख
जि.शि.व प्र.शि.सं.नागपूर
प्रमुख वक्ते
मा. विशाल नागदेवे,
Director of MHCRC Nagpur
–: आयोजक :–
डॉ. बालमणी नंदाला, समता उपविभाग प्रमुख, जि.शि.व प्र.सं.नागपूर व जिल्हा समन्वयक,
समावेशित शिक्षण, जि.शि.व प्र.सं.नागपूर तसेच समावेशित तज्ञ व संसाधन शिक्षक सर्व